बुद्धाब्द: २५६८. आसाळ्हमासो-सावनमासो

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

RNI क्रमांक - MHMUL/25/A1620

25 AUGUST 2025 सोमवार

1

संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित





# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष १ ले, अंक १

पृष्ठे ४, मूल्य १०

साप्ताहिक

"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |

प्रति
नाव:
पत्ता:
गाव/शहर:
जिल्हा:
राज्य:
पिन कोड:

**"स्वत:वर विजय मिळवणे म्हणजे सर्वात मोठा विजय आहे."**
**"स्वत:चा अभ्यास करा, कारण प्रकाश तुमच्याच आत आहे."**
**"द्वेष हा द्वेषाने नाही तर केवळ प्रेमानेच संपवता येतो."**
**"तुमचे मन जसे विचार करते, तसेच तुमचे आयुष्य घडते."**
**"अज्ञान हेच सर्व दु:खांचं मूळ आहे."**
**"जो स्वत:वर विजय मिळवतो, तोच खरा विजेता."**





## नवी मुंबई जिल्हास्तरीय भव्य धम्मपरिषद व २८ वा वर्धापन दिन सोहळा 🌸

भारतीय बौद्ध महासभा, नवी मुंबई जिल्हा आयोजित नवी मुंबई जिल्हास्तरीय भव्य धम्मपरिषद व २८ वा वर्धापन दिन सोहळा दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी अण्णासाहेब पाटील स्मृती भवन, कोपरखैरणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या भव्य सोहळ्याचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष मा. भीमराव  आंबेडकरजी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.धम्मकार्याला प्रेरणा देणाऱ्या या परिषदेत अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध धम्मविषयक मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले.





## दान पारमिता फाऊंडेशनचा धम्मरत्न पुरस्कार प्रदान सोहळा

सर जेम्स प्रिन्सेप यांनी धम्मलिपी पुनर्जीवित केली नसती तर धम्मचळवळ गतिमान झाली नसती – प्रा. जयश्री खरे-बागुल
नाशिक | परशुराम सायखेडकर नाट्यगृह येथे दान पारमिता फाऊंडेशन नाशिक आयोजित, अशोक स्क्रिप्ट इन्स्टिट्यूट अंतर्गत सर जेम्स प्रिन्सेप जयंती व विश्व धम्मलिपी गौरव दिवस कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध वक्त्या व परिवर्तनवादी चळवळीच्या अभ्यासक प्रा. जयश्री खरे-बागुल होत्या.
त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, “जर सर जेम्स प्रिन्सेप यांनी मृतप्राय धम्मलिपीला पुनर्जीवित केले नसते तर बौद्ध धम्मचळवळ गतिमान झाली नसती.” त्यांनी विद्यार्थ्यांना धम्मलिपी जपण्याचे, प्रसार करण्याचे व आत्मसन्मानाने तिचे अध्ययन करण्याचे आवाहन केले.
धम्मलिपी अभ्यासक अतुल भोसेकर यांनी प्रिन्सेप यांचे संशोधन, शिलालेखांचे डॉक्युमेंटेशन व मातीखाली दडलेल्या बौद्ध इतिहासाचे पुनरुज्जीवन याबद्दल सविस्तर माहिती दिली.
या सोहळ्यास प्रा. शरद शेजवळ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नागर्जून वाडेकर, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमात धम्मरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये मीनाक्षी शेगावकर (नाशिक), संघमित्रा जाधव (मुंबई), कविता हिवाळे (मुंबई), वंदना कुरणे (नवी मुंबई), कविता भालेराव (नाशिक), रोहिणी जाधव (नाशिक), वृषाली माने (मुंबई), वैशाली आहिरे (श्रीरामपूर), सविता धमगाये (नागपूर), लसरोज वाणी (नागपूर), धम्मनायिका महिला संघ (नाशिक), गायिका आम्रपाली पगारे (येवला), दीपा पवार (मुंबई), ऍड. रागिणी तायडे (बुलढाणा), प्रगती नाईकनवरे (पुणे), सुचित्रा गांगुर्डे (नाशिक), ज्योती गायकवाड (नाशिक), माधुरी सपकाळे (बोराळे-कल्याण), दिपश्री माने बलखंडे (कल्याण), अशोका पवार (इगतपुरी), प्रगती मेश्राम (चंद्रपूर), रुणाली जाधव (नाशिक), स्वप्ना थोरात (नाशिक) आदींचा समावेश होता.
फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील खरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रुपाली गायकवाड व आकाश हजारे यांनी केले. स्वागतगीत विजया उमाळे यांनी सादर केले तर आभार प्रदर्शन सहसंस्थापक सचिव संतोष आंभोरे यांनी केले.
कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी फाऊंडेशनचे सर्व संचालक, धम्मलिपी विद्यार्थी व अभ्यासकांनी परिश्रम घेतले. नागपूर, पुणे, गोंदिया, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, मुंबई आदी ठिकाणाहून अभ्यासक उपस्थित होते. अल्पोहाराची व्यवस्था राहुल बागले यांनी, तर भोजनाची व्यवस्था फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली होती.





## नवी दिल्ली – युवा बौद्ध विद्वानांचा आंतरराष्ट्रीय संमेलन

२२ ऑगस्ट २०२५ रोजी नवी दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरच्या नालंदा हॉलमध्ये 'थर्ड इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ यंग बौद्धिस्ट स्कॉलर्स' (ICYBS) आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम इंटरनॅशनल बौद्धिस्ट कॉन्फेडरेशन (IBC), भारताच्या संस्कृती मंत्रालय आणि डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने झाला. सर्वोच्च स्तरावर आयोजित या संमेलनाची थीम होती “विस्डम ट्रान्समिशन इन बुद्ध धम्मा in the 21st Century”, ज्यामध्ये बुद्धधम्माच्या ज्ञानप्रसारणाच्या आधुनिक मार्गांचा अभ्यास करण्यात आला. या कार्यक्रमात रशिया, व्हिएतनाम, कंबोडिया, श्रीलंका, म्यानमार, तैवान आणि भारत यांसह अनेक देशांतील युवा विद्वान, प्राध्यापक, भिक्षू आणि मान्यवर सहभागी झाले.
संमेलनात सम्राट अशोकांची बौद्ध धर्म प्रसारातील भूमिका, गुरु-शिष्य परंपरा, डिजिटल युगातील लिंगभेद, AI चा वापर, बौद्ध संस्था आणि संघाची आधुनिक भूमिका या विषयांवर सखोल चर्चासत्रे झाली. कीनोट अ◌ॅड्रेस प्रो. केटीएस सराव यांनी दिला तर गौतम बुद्ध युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सलर प्रो. राणा प्रताप सिंह यांची प्रमुख पाहुण्यांच्या भूमिकेत उपस्थिती होती.
भारतासह व्हिएतनाम, रशिया, कंबोडिया आणि म्यानमार येथील युवा विद्वानांनी बुद्धधम्माच्या आधुनिक संदर्भातील पेपर सादर केले. या संमेलनाला आधुनिक काळातील बौद्ध धर्म अभ्यास आणि ज्ञानप्रसारणाच्या चर्चेसाठी महत्त्वपूर्ण मानले गेले.

🔷 Tripitak Varta साप्ताहिकासाठी पेमेंट माहिती 🔷
बँकेची तपशीलावर माहिती :
🔹 Account Name: Tripitak Varta
🔹 Bank Name: Bank of Baroda
🔹 Account No.: 04510200001417
🔹 IFSC Code:- BARB0SHIPOO
BANK OF BARODA, SHIVAJI NAGR BRANCH.

**साप्ताहिकाची 2 महिन्याची सदस्यता फी पोस्टल चार्जेस संहित 200 रुपये आहे प्रतेक आठवड्याला घरपोष येईल**
**💬 पेमेंट झाल्यानंतर कृपया आपले नाव आणि स्क्रीनशॉट 9139509355 या WHATSAPP नंबरवर पाठवा.**
**🙏 आपले सहकार्य आम्हाला बौद्ध शिक्षण व समाजप्रबोधन कार्यात बळ देईल**

त्रिपिटक वार्ता साप्ताहिक ✍️ परामर्शदाता मंडळ - प्रा. (डॉ.) प्रफुल्ल गडपाल, प्रा.डॉ.धम्मदीप वानखेडे, डॉ. कीर्तिराज लोणारे, प्रा. विजय मोहिते. संपादकीय मंडळ काय अमित मेधावी, प्रा. रितेश ओव्हाळ, आयु. सतीश पवार, आयु. स्वातीताई गायकवाड




## संपादकीय :
## बौद्ध धम्मातील स्वातंत्र्य

स्वातंत्र्य ही प्रत्येक माणसाची मूलभूत गरज आहे. मात्र, हे स्वातंत्र्य केवळ राजकीय किंवा सामाजिक मर्यादित नसते; ते मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक पातळीवरही अत्यावश्यक असते. बौद्ध धम्म हेच सर्वांगीण स्वातंत्र्य देणारे तत्त्वज्ञान आहे, जे माणसाला बाह्य व अंत:करणातील सर्व बंधनांपासून मुक्त करण्यास मार्गदर्शन करते.
भगवान बुद्धांनी आपल्या धम्मामध्ये अंधानुकरण, दबाव किंवा जबरदस्ती कधीही मान्य केली नाही. “मा अनुमेय्य” या वचनाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की सत्य केवळ परंपरेमुळे मानायचे नाही; ते अनुभव, विचार आणि स्वतःच्या तपासणीतून स्वीकारले पाहिजे. ही विचारस्वातंत्र्याची शिकवण आजच्या विज्ञानयुगातही तितकीच महत्त्वाची आहे.
धम्माने समाजातील जातिभेद, अन्यायकारक प्रथा आणि उच्च-नीचतेच्या भावनांना मोडीत काढले. संघामध्ये सर्वांना समान स्थान दिले गेले. स्त्रियांना भिक्षुणी संघाच्या माध्यमातून धर्माचार्य होण्याचा अधिकार मिळाला, जे त्या काळात एक क्रांतिकारक पाऊल होते.
फक्त सामाजिकच नव्हे तर मानसिक गुलामगिरीतूनही बुद्धांनी मुक्ती दिली. लोभ, द्वेष, मोह या मानसिक विकारांपासून मुक्त होणे ही खरी स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.
पंचशीलाचे आचरण, ध्यान आणि प्रज्ञेच्या साधनेतून मन:शांती आणि आत्मिक स्वातंत्र्य साध्य होते.
बौद्ध धम्माचे अंतिम ध्येय म्हणजे निर्वाण – जन्ममरणाच्या अखंड चक्रातून मुक्ती. हेच खरे आणि सर्वोच्च स्वातंत्र्य आहे. आजच्या काळात माणूस भौतिकतेच्या, व्यसनांच्या, अंधश्रद्धांच्या नवनव्या गुलामगिरीत अडकतो, तेव्हा बुद्धांचा स्वातंत्र्याचा संदेश अत्यंत समकालीन ठरतो.
स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या विचारांवर आणि कर्मांवर नियंत्रण ठेवणे, भीती व ताणापासून मुक्त होणे, आणि इतरांशी करुणा व न्यायाने वागणे. हे केवळ व्यक्तीसाठीच नाही, तर संपूर्ण समाजासाठी आणि मानवतेसाठी उपयुक्त आहे.
ध्यान आणि प्रज्ञेच्या माध्यमातून माणूस आपल्या अंतरात्म्याशी संपर्क साधतो, निर्णय स्वयंच नियंत्रित करतो आणि बाह्य दबावांपासून मुक्त होतो. बुद्धांचे विचार आत्मनिर्भर बनवतात, सामाजिक बंधन ओलांडून स्वतंत्र जीवन जगण्यास मार्गदर्शन करतात.
शेवटी, खरे स्वातंत्र्य म्हणजे फक्त बाह्य बंधनांपासून मुक्त होणे नव्हे, तर मनातील भिती, द्वेष, लोभ यांसारख्या बंधनांपासूनही मुक्त होणे. ‘अप्प दीपो भव’ या वचनानुसार स्वतःचा दीप बनणे, स्वतःला प्रकाशमान करणे आणि इतरांना प्रकाश देणे हेच बौद्ध धम्मातील खरे स्वातंत्र्य आहे.
बौद्ध धम्माने दाखवलेला मार्ग जीवनाला अर्थपूर्ण बनवतो आणि प्रत्येक माणसाला सत्य, शांती व समाधीचा अनुभव देतो. बुद्धांचा स्वातंत्र्य संदेश – समाज, मन आणि आत्म्याला मुक्त करणारा प्रकाश – आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे.

## निर्मला जोगदंड : लेखिका, समुपदेशक, पत्रकार
## त्रिरश्मी बौद्ध लेणी

त्रिरश्मी बौद्ध लेणी यहां पर मैंने बहुत कुछ अनुभव किया, उनमें से कुछ अनुभव शेयर करती हूं!



१) रंग कलाकृति के अवशेष आज भी शेष आप कुछ मूर्तियों को गौर से देखेंगे तो पायेंगे कि प्राचीन काल की भव्य-दिव्य कलाकृति, रंग-संगति के कुछ अवशेष आज भी देख सकते हैं। आधुनिक काल में हम इंसानों ने हर क्षेत्र में प्रगति की है, परंतु उस काल में जो प्राकृतिक और वैज्ञानिक सोच और कार्य का संगम इन रंग चित्रकारिता और शिल्पों में मिलता है, वह आज हमें कहीं नहीं मिलता।
क्या हम हमारी यह विशेषता खो चुके हैं?
२) तथागत बुद्ध के मुख पर स्मित हास्य:
बुद्ध शिल्प के मुख को गौर से देखेंगे तो हमें लगेगा कि तथागत बुद्ध हमें देख रहे हैं और मुस्कुरा रहे हैं। स्मित हास्य कुछ शिल्प में बिल्कुल नजर आता है। आज हमारे पास मोबाइल की बैटरी, टॉर्च सब कुछ है, फिर भी हम ठीक से देख नहीं पाते। उस कालखंड में शिल्प बनाने वाले कलाकारों ने गहरे अंधेरे गर्भगृह में हूबहू शिल्प बना दिया। लाजवाब कलाकारी है, नवाज़ने हेतु कुछ शब्द नहीं हैं।
३) पत्थरों में शिल्पांकन:
जिन पहाड़ों में सख्त से सख्त चट्टान हो, वही पत्थर शिल्प बनाने के लिए उत्तम है, ऐसा वैज्ञानिक सोच के मुताबिक उस समय भी माना गया। और जहां-जहां उस प्रकार का पत्थर है, वहां-वहां बुद्ध लेणी स्थापित की गई। आप हर बौद्ध लेणी में देखोगे तो इस सख्त चट्टान पर हूबहू शिल्प बनाए गए हैं। पत्थरों की चिकनाई, गोलाकार विशेष तकनीकी से दी गई! न कोई मशीनरी, न कोई आधुनिक संसाधन – सिर्फ और सिर्फ छन्नी-हथौड़ा और तथागत बुद्ध के विचारों की प्रेरणा!
४) अफसोस है:
शायद मैं गलत हो सकती हूं। अफसोस है कि इन महान शिल्पकारों के नाम इन शिल्पों में दर्ज नहीं हैं? यह उन शिल्पकारों की महानता दर्शाती है। हालांकि खुद वे अपना नाम दर्ज कर सकते थे, पर जो कहा गया, वहीं लिख दिया।
५) पानपोडी/जलपोडी:
आप देखोगे कि बुद्ध लेणी पर, जो की शिखर पर पहाड़ी पर मौजूद है, बारहों महीने जल उन जलपोडियों में होता है। यह किसी आश्चर्य से कम नहीं है। कुछेक लेणी के जलपोडी का जल मैंने खुद पिया है और बहुत मीठा है।
बौद्ध लेणी धरोहर का प्रसार-प्रचार:
बौद्ध लेणी की जानकारी जन-जन तक पहुंचाना नितांत आवश्यक है। इससे अनुयायियों की संख्या में वृद्धि होगी।
मुझे खुशी है कि जिस वक्त मैं वहां थी तब एक पिता अपनी पुत्री के साथ थे और बस केवल इस कलाकृति को देख रहे थे। मैंने कहा, “आपके साथ आपकी बच्ची है, उसे इस बारे में कुछ बताएंगे तो वह कुछ जान पाएगी।” तो वह बोले, “मैं खुद ज्यादा नहीं जानता। पांडव लेणी है समझाकर आया हूं।” इस पर कुछ जानकारी मैं दे पाई। जाते हुए उन्होंने मेरा शुभनाम पूछा और कृतज्ञता व्यक्त की।
सच में! हमें बहुत काम करना है, बहुत लोगों तक पहुंचना है!
आजकल आपने देखा होगा यंगस्टर्स बहुत आते हैं और केवल यह धरोहर देख कर फोटो खींचवाते हैं। कहीं अंदर ही अंदर उनमें यह भावना है कि यह हमारी धरोहर है, पर क्या है – असल में यह वह भी जानना चाहते हैं।
गांव-गांव, शहर-शहर, स्कूल-विद्यालय-विश्वविद्यालयों में जाकर जानकारी देनी होगी। इस तरह हमें काम करना होगा। जिस प्रकार त्रिरश्मी बौद्ध लेणी के प्रांगण में हाल ही में हनुमान का सीमेंट-कंक्रीट का बना एक शिल्प है, कहीं ऐसा न हो कि रातों-रात कुछ धार्मिक प्रवृत्ति के लोग उसे मंदिर में रूपांतरण कर दें। हमें जागृत रहना होगा और इसी तरह अतिक्रमण को हटाना होगा।

## आयुनी. स्वाती जगन्नाथ गायकवाड.
## भारतीय बौद्ध महासभा
## श्रामणेरी बौद्धाचार्या. केन्द्र शिक्षिका, महाराष्ट्र राज्य संस्कार उपाध्यक्ष, धम्मलिपि संचालिका.

वर्षाकाळात गृहस्थी उपासक / उपासिका (मानवांचे) कर्तव्य काय आहे? त्यांनी या काळात काय करावे?
वर्षाकाल म्हणजे पावसाळा दिवस बातावरणातील कडक उन्हाळ्याचा ताप कमी होऊन अल्हाददायक मनाला प्रसन्न करणारे वातावरण तयार झालेले असते. या काळात मनाला मोहवणारे अनेक प्रसंग असतात. त्याप्रमाणे कधी कधी समस्या निर्माण होऊन दुखनिर्मिती करणारे प्रसंग देखील असतात . या साठी आपण संयमीत राहिले पाहिजे. तथागत भ. बुध्दानी भिक्खू व उपासक दोघांसाठी धम्म दिलेला आहे. नियम केले आहेत. फरक हाच की भिक्खूंना नियम बंधनकारक आहेत .उपासकांना बंधनकारक नाहित. अनेक लोकांचा असा गैरसमज होती की उपासकांसाठी फक्त पंचशीलच दिले आहे. बाकी नियम तर भिक्खूसाठीच आहेत. पण जर आपण बुद्ध आणि त्यांच्या धम्मग्रंथ वाचला तर निश्चितच आपण काय काय करावे काय करू नये याची माहिती मिळते. या काळात आपले कर्तव्य काय आहे? आपण नेहमी त्रिसरण पञ्चशील म्हणतो पण त्याचे आचरण पुर्णतः करत नाही. कळतनकळत आपल्या हातून अनेक चुका होत असतात किमान वर्षाकाळाचे तिन महिने आपण पंचशील पालन करण्याचा तसेच याकाळात येणारी अष्टमी, पोर्णिमा या उपोसथ दिवशी श्रद्धायुक्त भावनेने अट्ठशील पालन करणे. स्वतः काया वाचा मनाने कोणाचीही हत्या करू नका. कोणाला हत्या करण्यास प्रेरित करू नका सांगू नका, सर्व प्राणीमात्राविषयी दयाभाव बाळगा मैत्री करा. त्यांच्यावर प्रेम करा. केवळ पैशाच्या लोभापायी विकारी होऊ नका. जसा तुमचा जीव अनमोल आहे तसाच इतरांचाही जीव अनमोल आहे. जे आपले नाही ज्याच्यावर आपला हक्क नाही अशी कोणतीही दुसऱ्यांची वस्तु घेऊ नका. नोकरीव्यवसायात असाल तर प्रमोशनप्रलोभन किंवा इतर भेटवस्तू या मोहात पडून चुकिचे वर्तन करू नका ( चोरी करू नका) कामविकारांपासून नेहमी सालिप्त राहा. कामविकारांमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल्याचे आपण नेहमीच बातम्यात ऐकतो हळहळतो. यासाठी आपणही दक्ष राहणे, इतरांना मार्गदर्शन करणे, यापासून परावृत्त करणे कुशल कर्म ठरते.
खोटे बोलणे, दुसऱ्यास खोटे बोलण्यास प्रवृत्त करू नये. त्यामुळे मुळे इतरांच्या विश्वासास अपात्र ठरेल असे कृत्य करू नये.
नशिल्यापदार्थाचे सेवन करू नये, दुसऱ्यास नशेचे पदार्थ देऊन त्यांची हानी करू नये. म्हणजेच आपण नित्य हिंसा, चोरी, व्याभीचार, असत्य, व नशापान आपासून अलिप्त राहून आपले व कुटुंबाचे रक्षण करावे. त्याबरोबरच या काळात मोहमग्री वातावरण असते त्यातून बाहेर पडद्यासाठी किमान आठवडयातून 1/2 दिवस तरी विहारांत जावे. सोबत आपल्या मुलांना परिवारास न्यावे .पुर्ण श्वेत कपडे परिधान करावे.
भगवान बुद्धांच्या काळात 7 वर्षाची विशाखा श्रोतापन्न झाली होती. आपण विहारात जाताना कोणतेही कर्मकांड करत नाही नसून ज्या महा मानवांनी आम्हाला दुःख मुक्तीचा मार्गसांगीतला व ज्यांनी आम्हाला अंधकार-अज्ञान असमानता अस्पृश्यता) खाईतून बाहेर काढून बौद्ध धम्म दिला अशा दोन्ही महामानवाला वंदन करण्यास जात असतो. यासाठी अगरबत्ती मेणबत्ती - फुल (घर) या गोष्टी घ्या. तसेच
विहारात भन्ते असतात त्यांना किमान महिन्यातून एक वेळेस तरी घरी भोजनाला बोलवावे अथवा आपण स्वतः त्यांच्याकडे भोजनदानाची याचना करून विहारातच भोजन दयावे. त्यांच्याकडून धम्मजाणून घ्यावा. त्यांना धम्म देसनेची याचना करावी. ''भगवान बुध्द आणि त्यांचा श्रम्म ग्रंथ नुसता नुसता वाचू नये त्यावर धम्मचर्चा घडवून आणावी, धम्मप्रवचने कार्यक्रमांचे आयोजन करून इतरांना सहभागी करुन घ्यावे.
बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संस्थेमार्फत (भारतीय बौध्द महासभा) अनेक शाखांमधून देशात अनेक ठिकाणी प्रवचन मालिका राबवल्या जातात. त्यात सहभागी होऊन धम्मप्रवचनाचा लाभ घ्यावा भन्ते (भिक्खूंना भोजन दिले म्हणजे सर्व संपले असे नाही तर या काळात सर्वसामान्य मनुष्य आजारी पडतो तसे भिक्खूसुद्धा आजारी पडू शकतात. त्यासाठी त्यांची वेळोवेळी चौकशी करणे. काळजी घेणे. आजारी असल्यास त्यांना दवाखान्यात नेणे सुश्रूषा करणे हे देखिल आपले कर्तव्य आहे. भिक्खुंना वेळोवेळी नैतिक गरजेच्या गोष्टी दान देने(तेल,साबण , कपडे पावडर,वत्सरा, कोलगेट....इ.) हे देखील आपले कर्तव्य आहे. आजच्या आधुनिक युगात आपण बुद्ध मार्गावर जायला पाहिजे पण अधिकाधिक लोक कर्मकांड करण्याकडे वळत आहेत. हिंदू धर्मातील पुराणे परंपरा सण साजरे करतात.घरी गणपती बसवणे,गरबा खेळणे, दहिहंडी फोडणे..... हे खेळ सर्रास खेळतात. तसेच फॅशन घ्या नावाखाली फाटक्या जिन्स, फाटके टिशर्ट घालने, पायात , हातात दोरा बांधने, मुलांनी कानात रिंग घालून. दिसून येते ते आपण थांबवले पाहिजे . अशाच मुलांसाठी (self development) व्यक्तीमित्र विकास शिबिर घेउन त्यांना वळण लावले पाहिजे. स्वतः धम्ममार्गावर आरुढ झाले पाहिजे व इतरांना ही प्रोत्साहित केले पाहिजे.

**लेख : राकेश सदानंद पवार 9867355724 लेणी संवर्धक / अभ्यासक.**
**एकजूट लेणी अभ्यास प्रचार समूह, महाराष्ट्रराज्य - लेणीसंवाद.**

**संदर्भ :**
**महाराष्ट्राची बौद्ध लेणी, डोंगर दरीतला फिरस्ती.**

## तुळजा बुद्ध लेणीसमूह




भारतात जेवढ्या 1200 चा आसपास लेण्या सापडतात त्यातील 1000 चा आसपास महाराष्ट्रात सापडतात. त्यातंच महाराष्ट्रातील पुण्या मधील, जुन्नर म्हणजे लेण्यानचे नंदनवनच म्हणटले पाहिजे कारण जुन्नर परिसरात अधिक लेण्या सापडतात. यामधला एक तुळजा बुद्ध लेणी समुह, तुळजा बुद्ध लेणीचे महत्व असे आहे की महाराष्ट्रामधे कोरण्यात आलेली बहुतेक पहिली लेणी असावी आणि ही, सम्राट अशोक त्यांचा काळात कोरली गेली असे इतिहास अभ्यासकाचे मत आहे. तुळजा बुद्ध लेणीसमूह हे हीनयान चैत्यगुह जुन्नरच्या सर्व लेण्यांपैकी प्राचीनतम लेणे आहे. जुन्नरचा परिसरात आणि डोंगररांगावर नाणेघाटसहित २०० चा आसपास लेण्या कोरल्या आहेत. जुन्नरचे सात उपगट आहेत. भीमाशंकर, मानमुकुड(अंबिका), भूत लेणी, शिवनेरी, कपिचित लेणी (गणेश), सुलेमान आणि तुळजा लेणी. शिवनेरी किल्यापासून पचिम बाजूला कडेलोटचा पायथ्याजवळ साधारण ३ की. मि. लांबीवर एक टेकडी लागते. त्या टेकडीजवळ ठाकरवाडी गाव आहे त्याचा शेवटी हे लेणे जुन्नर गावाजवळच्या तुळजा गावापासून अर्ध्या किलोमीटरवर आहे.तुळजा बुध्द लेणीचा चैत्यगृहाचे विधान वर्तुळाकार असून त्रिज्या ८.२३ मीटर आहे. मध्यभागी असलेल्या साध्या स्तूपाभोवती १२ अष्टकोनी स्तंभ आहेत. हे स्तंभ तळाजवळ जाड असून किंचितसे आतल्या बाजूला कललेले आहेत बाजूच्या भिंती आणि छतावर मातीचा गिलावा आहे. या गिलाव्यावर चित्र रंगवलेली असावीत. ही साधारण ६ व्या शतकातील असावीत असे वाटते. तेथील चित्रे अजिंठा येथे लेणे क्र. १० मधील चित्रा प्रमाणे असावीत पण ती आता नष्ट झाली आहेत. ( अशी माहिती मिळते की १९१८ मध्ये ह्या लेणीची माहिती हेन्नरी कुझेनचा कानावर गेली. मुंबई गव्हर्नर व तो ही लेणी पाहण्यासाठी येणार होते. असा निरोप जुन्नरचा तत्कालीन कलेक्टरल मिळाला होता. गव्हर्नर येणार महणून साफ सफाई करून घेण्यात आली. वाढलेली झाडी,झुडपे, कोळीजलमटे काढण्यात आली. पानी टाकून गोणपाट, कांबळीचा मदतीने भिंती साफ करण्यात आल्या. त्यामुले चित्रे नष्ट झाली. जेव्हा गव्हर्नर आणि हेनरी कुझेन आले जे पाहण्यासाठी ते नष्ट झालेले पाहून डोक्यावर हात मारून घेतला होता. अतिउस्तहात व आज्ञानापायी ऐतिहासिक ठेवा नष्ट झाला होता. या बाबतचा तेव्हाचा अहवाल आजही पुरातत्व खात्याकडे आहे. हया चैत्यगुहाचे प्रवेशद्वार आज अस्तित्वात नाही. येथील स्तूपाच्या समोर मंडप नाही. तुळजा बुद्ध लेणी, स्तूप व त्यावर असलेले गोलक्षत्र व १२ गोलाकार स्तंभ अशी रचना अन्यत्र कुठेही आढळून येत नाही. असा स्तूप भारतातील एकमेव आहे. तरी १२ पैकी 1 स्तंभाची डागडुजी सध्याचा काळात करण्यात आली आहे असे दिसते.

तुळजा बुद्ध लेणी उत्तरभिमुख असून त्यांत एकूण तेरा लेणी आहेत. यांपैकी लेणे क्र. 3 हे चैत्यगृह, तर उर्वरित विहार व इतर सामान्य खोल्या आहेत. त्यांतील बहुतेकांची प्रवेशद्वारे काळाच्या ओघात तुटलेली आहेत. यांशिवाय तीन अपूर्ण लेणी व दोण पाण्याची टाकी (पानपोई ) या लेणी समूहात खोदली आहेत. या लेण्यांत अद्यापि एकही शिलालेख आढळलेला नाही. तसेच काही ठिकाणी लेणीचा छताचा वरच्या भागात, पुढील बाहेरच्या बाजूला नक्षीकाम केलेले पहायला मिळते. यात उपासक स्तुपाची पुजा करताना दिसतात. तसेच पावसाळ्यात डोंगरावरून कोसळणारे पाणी धबधब्याचे रुपात पाणि लेणी वरून समोरच पाण्याची टाकी (पानपोई ) मध्ये पडून यामध्ये साठवले जाते. पावसाळ्यात लेण्यांचे सौंदय तर पहाण्या सारखे असते.

लेणी क्र.३ चेत्यगृह आहे. त्याचा बाजूचा लेणी क्र. ४ मध्ये मध्यमयुग काळात तुळजाभवानीची मुर्ती स्थापन केल्याचे बोलले जाते. या संपूर्ण टेकडीला तुळजा टेकडी 'असे' म्हणू लागले. लेणे क्र.४ लहानसे विहार, असून पुढचा भाग तुटला आहे. डावीकडील मागील बाजूस दोन खोल्या असून, एका बाजूला आधुनिक लाकडी चौकट व दरवाजा बसवला आहे. आत उजव्या बाजूला खोलीत तुळजाभवानीची स्थापना केली आहे. त्याला ही आधुनिक चौकट दरवाजा लावला आहे.

पण हि पूर्णता बुद्ध लेणी आहे. चैत्यस्तूप असणे हाच मोठा पुरावा आहे. तसेच लेणी क्र.३ वरील चैत्य स्तूपाचा पाठचा मागे खोबण आहे. त्या ठिकाणी अरंहनत, भिकू, यांचा अस्थी, त्यांनी वापरलेले वस्तू ठेवत. तसेच मौल्यवान वस्तू त्याबरोबर ठेवत त्या काढण्यासाठी त्या ठिकाणी काला नुसार तोडफोड झालेली दिसते.

ह्या लेणीवर सुरक्षेच्या दुष्टीने लेण्यांवर समोर साईडला लोखंडी बॅरिकेट हयाची उपाय योजना करने आवश्यक होते. फेब्रुवारी २०२४ रोजी एकजूट लेणी संवर्धक आणि बुद्ध मुक्ती आंदोलन ह्यांची शिवाजी महाराज जयंती निम्मीत कार्यशाळा झाली त्यात १०० चा आसपास लेणी संवर्धक, पर्यटक ह्यांचावर त्यावेळी मधमांशनी हल्ला केला होता. त्या वेळी सुरक्षेचा दृष्टीने लोखंडी बॅरिकेट लावण्याची मांगणी करण्यात आली होती. त्या प्रमाणे आता आपणास बॅरिकेट लावलेले पाहण्यास मिळतात. तसेच येथे बाथरूमची सोय नाही आहे. कार्ले लेणी प्रमाणे ती असावी कारण पर्यटक, अभ्यासक, परदेशी पर्यटक भेट देत असतात. तसेच तुळजा बुद्ध लेणीवर जाण्यास रस्ताही नीट नाही आहे. तसेच सुरुक्षेचा दुष्टीने बोर्ड लावलेले दिसत नाही. तसेच लेणी क्र. १३ चा आसपास मधमाशाचा आहे. हयाची माहीती दिली जात नाही तरी प्रत्येकाने भेट देताना काळजी घ्यावी. पुरातवखात्याने ह्या गोष्टीनकडे लक्ष दिले पाहीजे हयावर उपाय योजना केली पाहीजे.

प्रत्येकानसाठी आपला इतिहास, वारसा चक्रवर्ती सम्राट अशोक हयानी आपल्या साठी, लेण्या, स्तंभ, शिलालेख, शिल्प, लोखंडी लेखणीने लिहून, कोरून ठेवला आहे आपल्यासाठी किती ति दूरदृष्टी. लेण्या, शिल्प, चेत्यस्तूप अतिक्रमानाचे हातोडायचे घाव अंगावर घेवून आपल्या साठी खंबीर उभे आहेत टिकून आहेत. कोणी आपला येईल आपला इतिहास वाचेल सांगेल आम्हाला अतिक्रमातून मुक्त करेल अतिक्रमापासून वाचवेल आमचा खरा इतिहास समोर आणेल शिल्प , लेण्या, स्तूप, स्तंभ, लेख आपल्याला आवज देत आहेत या लेकरानो आम्हाला अतिक्रमापासून वाचवा आमचा इतिहास तुमचा मुलाबाळा परेंत पोहचवा पुढच्या पिढीसाठी संवर्धन करा ही तुमची जिम्मेदारी म्हणजेच आपल्या सर्वांची जिम्मेदारी आहे. चक्रवर्ती सम्राट अशोकामुळे बौद्ध धम्म जगभर पसरला त्यांचा मुळे आपला इतिहास जिवंत आहे तरी प्रत्येकाला सम्राट अशोक समजले पाहिजे म्हणून सम्राट अशोक प्रतिमा घरा-घरात प्रत्येक बुद्ध विहारात ही आपली जिम्मेदारी. तसेच धम्म लिपि (ब्राह्मी), पाली भाषा प्रतेकाने शिकणे आपली सर्वांची जिम्मेदारी.

## पालि भाषेतील संभाषण प्रथम पालि वाक्य, मराठी अर्थ, हिंदी अर्थ आणि इंग्रजी अर्थ दिले आहेत:

लि वाक्य: अहं गामं गच्छामि।
मराठी अर्थ: मी गावाला जातो।
हिंदी अर्थ: मैं गाँव जाता हूँ।
इंग्रजी अर्थ: I go to the village.
उच्चार: Ahaṃ gāmaṃ gacchāmi.
पालि वाक्य: त्वं रुक्खं पस्ससि।
मराठी अर्थ: तू झाड पाहतोस।
हिंदी अर्थ: तू पेड़ देखता है।
इंग्रजी अर्थ: You see the tree.
उच्चार: Tvaṃ rukkhaṃ passasi.
पालि वाक्य: सो धम्मं वदति।
मराठी अर्थ: तो धम्म बोलतो।
हिंदी अर्थ: वह धर्म बोलता है।
इंग्रजी अर्थ: He speaks the Dhamma.
उच्चार: So dhammaṃ vadati.
पालि वाक्य: मयं फलं खादाम।
मराठी अर्थ: आम्ही फळ खातो।
हिंदी अर्थ: हम फल खाते हैं।
इंग्रजी अर्थ: We eat the fruit.
उच्चार: Mayaṃ phalaṃ khādāma.
पालि वाक्य: तुम्हे बुद्धं नमथ।
मराठी अर्थ: तुम्ही बुद्धाला नमन करता।
हिंदी अर्थ: तुम बुद्ध को नमस्कार करते हो।
इंग्रजी अर्थ: You pay homage to the Buddha.
उच्चार: Tumhe buddhaṃ namatha.

पालि वाक्य: ते सङ्घं पस्सन्ति।
मराठी अर्थ: ते संघाला पाहतात।
हिंदी अर्थ: वे संघ को देखते हैं।
इंग्रजी अर्थ: They see the Sangha.
उच्चार: Te saṅghaṃ passanti.
पालि वाक्य: सा कथं सुनाति।
मराठी अर्थ: ती कथा ऐकते।
हिंदी अर्थ: वह कहानी सुनती है।
इंग्रजी अर्थ: She listens to the story.
उच्चार: Sā kathaṃ sunāti.
पालि वाक्य: ता उदकं पिवन्ति।
मराठी अर्थ: त्या पाणी पितात।
हिंदी अर्थ: वे पानी पीती हैं।
इंग्रजी अर्थ: They drink water.
उच्चार: Tā udakaṃ pivanti.
पालि वाक्य: अहं सुत्तं सिक्खामि।
मराठी अर्थ: मी सुत्त शिकतो।
हिंदी अर्थ: मैं सूत्र सीखता हूँ।
इंग्रजी अर्थ: I learn the Sutta.
उच्चार: Ahaṃ suttaṃ sikkhāmi.
पालि वाक्य: त्वं कम्मं करोसि।
मराठी अर्थ: तू काम करतोस।
हिंदी अर्थ: तू काम करता है।
इंग्रजी अर्थ: You do the work.
उच्चार: Tvaṃ kammaṃ karosi.

**पालि भाषेतील वर्तमानकाळ (वत्तमाना काल)**
**1. व्याख्या वर्तमानकाळ (वत्तमाना काल) सध्याच्या कृती, अवस्था किंवा घडामोडी दर्शवतो. उदा., गच्छति (तो जातो), खादामि (मी खातो).**

2. प्रत्यय (Suffixes) गच्छ +

| पुरुष | एकवचन उदाहरण | अनेकवचन उदाहरण |
|---|---|---|
| प्रथम (उत्तम) - | आमि (मी जातो) - | आम (आम्ही जातो) |
| द्वितीय (मध्यम) - | सि (तू जातोस) - | थ (तुम्ही जाता) |
| तृतीय (प्रथम) - | ति (तो/ती जाते) - | न्ति (ते/त्या जातात) |

3. सर्वनाम (सब्बनामं)

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम | अहं (मी) | मयं (आम्ही) |
| द्वितीय | त्वं (तू) | तुम्हे (तुम्ही) |
| तृतीय | सो (तो), सा (ती) | ते (ते), ता (त्या) |

पाली सर्वनाम आणि मराठी अर्थ
1. प्रथम पुरुष (उत्तम पुरुष)
एकवचन: अहं (मी)
उदाहरण वाक्य: अहं गामं गच्छामि।
मराठी अर्थ: मी गावाला जातो।
अनेकवचन: मयं (आम्ही)
उदाहरण वाक्य: मयं फलं खादाम।
मराठी अर्थ: आम्ही फळ खातो।
2. द्वितीय पुरुष (मध्यम पुरुष)
एकवचन: त्वं (तू)
उदाहरण वाक्य: त्वं रुक्खं पस्ससि।
मराठी अर्थ: तू झाड पाहतोस।
अनेकवचन: तुम्हे (तुम्ही)
उदाहरण वाक्य: तुम्हे बुद्धं नमथ।
मराठी अर्थ: तुम्ही बुद्धाला नमन करता।

3. तृतीय पुरुष (प्रथम पुरुष)
एकवचन: सो (तो) / सा (ती)
उदाहरण वाक्य (सो): सो धम्मं वदति।
मराठी अर्थ: तो धम्म बोलतो।
उदाहरण वाक्य (सा): सा कथं सुनाति।
मराठी अर्थ: ती कथा ऐकते।
अनेकवचन: ते (ते) / ता (त्या)
उदाहरण वाक्य (ते): ते सङ्घं पस्सन्ति।
मराठी अर्थ: ते संघाला पाहतात।
उदाहरण वाक्य (ता): ता उदकं पिवन्ति।
मराठी अर्थ: त्या पाणी पितात।



## भारतामधील बौद्ध विद्यापीठांचा अभ्यास : जनतेसाठी उपयुक्त प्रवचन

जातेगाव (ता. नांदगाव, जि. नाशिक) येथील बौद्ध विहारात आयोजित प्रवचनात “भारतातील बौद्ध विद्यापीठे” हा विषय घेण्यात आला. या विषयावर माहिती देताना प्रवचनकारांनी सांगितले की, बौद्ध विद्यापीठांचा इतिहास अत्यंत महत्त्वाचा असून यामुळे बौद्ध समाजासोबतच सर्व समाजाला प्राचीन शिक्षण परंपरेची माहिती मिळते.

प्रवचनात सांगण्यात आले की, बौद्ध विद्यापीठे स्थापन होण्यापूर्वी काही ऋषी–मुनी व ब्राह्मण विद्वान श्रीमंत व उच्चकुळातील मुलांना आश्रम पद्धतीने शिक्षण देत असत. या शिक्षणात विद्युतशास्त्र, निसर्गशास्त्र, औषधनिर्मिती, आयुर्वेदशास्त्र, तसेच व्यायाम यांचा समावेश असे. त्या काळी लिपी वा लेखनशास्त्र विकसित झाले नव्हते.

बौद्ध विद्यापीठे स्थापन झाल्यानंतर मात्र भगवान बुद्धांच्या ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ या तत्त्वज्ञानानुसार प्रत्येकासाठी शिक्षणाची दारे खुली झाली. इ.स.पूर्व चौथ्या शतकापासून बौद्ध काळात मोठे–मोठे विहार व विद्यापीठे उभी राहिली. या विद्यापीठांत भिक्षूंसह जिज्ञासू विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शिक्षण विनामूल्य दिले जात होते.

या विद्यापीठांत धर्म, विनय, गाथा, तसेच विविध शास्त्रांचे शिक्षण दिले जाई. त्या काळी १९ बौद्ध विद्यापीठे भारताच्या विविध प्रांतांत फुलली होती. आज या विद्यापीठांची अवस्था वेगवेगळी असली तरी त्यांचा ऐतिहासिक वारसा बौद्ध समाजाला दिशा देणारा आहे, असे प्रवचनात सांगण्यात आले.

👉 या माहितीमुळे बौद्ध समाज व सर्वसामान्य अभ्यासकांना प्राचीन शिक्षण परंपरेचा अभ्यास करण्यास मदत होईल, असेही प्रतिपादन करण्यात आले.



## जातेगाव येथे पंचशील बुद्ध विहारात त्रिशरण व पंचशील कार्यक्रम संपन्न

जातेगाव (ता. नांदगाव, जि. नाशिक) येथील पंचशील बुद्ध विहारात बौद्ध धर्मविषयी सखोल माहिती देण्यात आली. कार्यक्रमात संविधान पुस्तकाचे दान करण्यात आले तसेच उपस्थितांना त्रिशरण, पंचशील संपूर्ण वंदना व बावीस प्रतिज्ञा देण्यात आल्या.

कार्यक्रमात पंचशीलाचे महत्व स्पष्ट करण्यात आले तसेच पंचशील पालनामुळे होणारे फायदे समजावून सांगण्यात आले. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये बौद्ध उपासक-उपासिका यांच्या वतीने मान्यवरांचा शाल अर्पण करून सत्कार करण्यात आला.

त्रिशरण व पंचशीलाचे अर्थपूर्ण स्पष्टीकरण देत सर्वांना प्रत्यक्ष जीवनात ते आचरणात आणण्याचा सल्ला देण्यात आला.

जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी: जेम्स प्रिन्सेप हे JOURNAL OF THE ASIATIC SOCIETY OF BENGAL चे संस्थापक संपादक होते. या जर्नलद्वारे त्यांनी भारतातील पुरातत्व, इतिहास आणि संस्कृतीवरील संशोधन प्रसिद्ध केले.

नाणेशास्त्र आणि धातुशास्त्र: त्यांनी प्राचीन भारतीय नाण्यांचा अभ्यास केला आणि त्यांचे चित्रण केले. याशिवाय, त्यांनी टकसालातील धातुशास्त्राशी संबंधित अनेक नवकल्पना केल्या.

वास्तुकला आणि नकाशे: बनारस येथे त्यांनी नवीन टकसाल भवन आणि एक चर्च डिझाइन केले. त्यांचा बनारसचा नकाशा आजही प्रामाणिक मानला जातो.

*वैयक्तिक जीवन आणि मृत्यू*

वैयक्तिक जीवन: जेम्स प्रिन्सेप यांनी आपले संपूर्ण आयुष्य संशोधन आणि कार्याला वाहिले. त्यांच्या व्यस्त दिनचर्येचा उल्लेख फ्रेंच प्रवासी विक्टर जाकेमो यांनी केला आहे, ज्यांनी लिहिले की प्रिन्सेप सकाळी नकाशे तयार करत, दिवसभर टकसालात काम करत आणि संध्याकाळी संगीत सभांमध्ये सहभागी होत.

मृत्यू: दीर्घकालीन अथक परिश्रम आणि मानसिक तणावामुळे त्यांचे आरोग्य बिघडले. 1840 मध्ये, वयाच्या अवघ्या 41 व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या स्मरणार्थ हिमालयातील एका वनस्पतीला PRINSEPIA असे नाव देण्यात आले.

वारसा जेम्स प्रिन्सेप यांचे कार्य भारतीय इतिहास आणि पुरातत्वाच्या क्षेत्रात अजरामर आहे. त्यांच्या धम्मलिपी लिपीच्या उलगड्यामुळे सम्राट अशोक आणि मौर्य साम्राज्याचा इतिहास जगासमोर आला.

त्यांनी बनारस शहराच्या विकासात दिलेले योगदान, विशेषतः ड्रेनेज सिस्टम आणि नकाशे, आजही वापरात आहेत आणि त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. त्यांच्या BENARES ILLUSTRATED या पुस्तकातील नकाशे आणि चित्रे आजही बनारसच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण संदर्भ आहेत.

त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे वंशज इवान प्रिन्सेप यांनी त्यांच्याशी संबंधित दस्तऐवज दिल्ली येथील राष्ट्रीय संग्रहालयाला सुपूर्द केले.

*निष्कर्ष*

जेम्स प्रिन्सेप हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते, ज्यांनी विद्वान, पुरातत्वशास्त्रज्ञ, वास्तुकार आणि प्रशासक म्हणून आपली छाप सोडली. त्यांचे धम्मलिपी आणि खरोष्ठी लिपींचे वाचन आणि सम्राट अशोक यांच्या शिलालेखांचा उलगडा हे भारतीय इतिहासलेखनातील सर्वात मोठे योगदान आहे. बनारस शहराच्या विकासातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे त्यांना "बनारसचे जनक" असेही संबोधले जाते. त्यांचे कार्य आजही इतिहासकार, पुरातत्वशास्त्रज्ञ आणि भारतीय संस्कृतीच्या अभ्यासकांसाठी प्रेरणादायी आहे

## सिद्धार्थ महाविद्यालयात "विश्व धम्मलिपी गौरव दिवस" उत्साहात साजरा वर्धा |

सिद्धार्थ महाविद्यालयात सर जेम्स प्रिन्सेप यांची २२६ वी जयंती व विश्व धम्मलिपी गौरव दिवस मोठ्या उत्साहात व अभ्यासपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सुनतकरी यांनी विद्यार्थ्यांना धम्मलिपी व सर जेम्स प्रिन्सेप यांच्या कार्याची महत्ता सांगत या वारशाचे जतन व संवर्धन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धम्मलिपी प्रशिक्षिका मा. छायाताई पाटील (विरार) उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना धम्मलिपीचे वैश्विक महत्त्व पटवून देत, ती केवळ भारताची नव्हे तर जगातील अनेक लिपींची जननी असल्याचे सांगितले. त्यांनी प्रत्यक्ष धम्मलिपीत नावे लिहिण्याचे रंजक प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांकडून करून घेतले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर जेम्स प्रिन्सेप व मा. अलेक्झांडर कनिंगघम यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. महाविद्यालयाचे प्रा. विजय मोहिते व पालि विभाग प्रमुख प्रा. विनोद भेले यांनीही या दिवसाचे महत्त्व व धम्मलिपीचा इतिहास उलगडून सांगितला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. विजय मोहिते यांनी सर्वांचे आभार मानले. हा सोहळा अतिशय अभ्यासपूर्ण व रंजकरीत्या पार पडला.

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले |
RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."